**कृपया प्रसिध्दिसाठी** **11सप्टेंबर 2009**

## तारापूर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी सर्व संबंधितांना एकत्र येण्याची उच्चन्यायालयाची सूचना

**मुंबई, शुक्रवार :** तारापूर अणुऊर्जा प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या अक्करपट्टी-पोफरण या गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न प्रदीर्घ काळ रेंगाळला असल्याने सर्व संबंधितांनी एकत्र बसून तडजोडीने मार्ग काढावा, अशी सूचना आज मुंबई उच्च न्यायालयाने केली आहे.

न्यायमूर्ती श्रीमती रंजना देसाई व न्यायमूर्ती श्री. ए.ए. सय्यद यांच्या खंडपीठासमोर आज या संदर्भातील रिट याचिकेची सुनावणी होती. संबंधितांनी आपले म्हणणे अंतिम स्वरुपात मांडावे असे या अगोदरच खंडपीठाने सुचविले होते. त्यानुसार प्रकल्पग्रस्तांचे वकील ॲड. राजीव पाटील व खटल्यात हस्तक्षेप केलेले माजी केंद्रिय मंत्री श्री. राम नाईक यांनी अद्यापही पुनर्वसित गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय झाली नसल्याकडे न्यायालयाचे लक्ष वेधले. यावर तात्काळ कारवाई करण्याचे आदेश न्यायालयाने राज्य सरकारला दिले. त्यानंतर केंद्र सरकारचे पुनर्वसन धोरण 2003 व 2007 प्रमाणे या सर्व प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या खर्चाची जबाबदारी न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशनचीच आहे, असे प्रतिपादन श्री. नाईक यांनी केले. राज्य सरकारच्यावतीने ॲड. नितीन देशपांडे तर न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशनतर्फे ॲड. राजीव कुमार, ॲड. राजेश कोठारी,ॲड. लोपा मुनिम यांनीही आपली बाजू न्यायालयासमोर मांडली.

या प्रकरणी न्यायालयाला श्री. राम नाईक यांनी सांगितले की प्रकल्पपीडितांच्या सहकार्यामुळे 1,080 मेगॅवॅट निर्माण करावयाच्या या प्रकल्पातील 540 मेगॅवॅटचे पहिले संयंत्र नियोजित उद्दिष्टाच्या 230 दिवस अगोदर तर 540 मेगॅवॅटचे दुसरे संयंत्र उद्दिष्टाच्या 166 दिवस अगोदर कार्यान्वित झाले असल्यामुळे न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशनचे सुमारे रु.400 कोटी वाचले आहेत. तसेच अंदाजित रु. 6,525 कोटीच्या खर्चाच्या ऐवजी प्रत्यक्ष खर्च रु. 6,100 कोटी म्हणजेच रु.425 कोटी वाचले आहेत. अशा प्रकारे रु.825 कोटींचा खर्च वाचला असूनही न्युक्लिअर कॉर्पोरेशन केंद्र सरकारच्या धोरणाप्रमाणे प्रकल्पग्रस्तांना आवश्यक ते फायदे देण्याची टाळाटाळ करीत आहे.

त्यानंतर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासंबंधीचा हा खटला गेली 5 वर्षे सुरु असून अधिक विलंब होऊ नये म्हणून श्री. राम नाईक यांच्यासह खटल्यातील सर्व वादी, प्रतिवादींनी एकत्र बसून चर्चा करुन मार्ग काढावा व 5 ऑक्टोबर 2009 रोजी न्यायालयासमोर मांडावा अशी सूचना खंडपीठाने केली.

**(कार्यालय सचिव)**